ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# भारतीय राजकारणात आदिवासी महिलांचा सहभाग

**प्रा. रिता पी. खोब्रागडे**
कार्यकारी प्राचार्य
गृहअर्थशास्त्र दृ विभाग प्रमुख
एस चंद्रा महिला महाविद्यालय, सडक अर्जुनी जि. गोंदिया

★★★

**प्रस्तावना -** आदिवासी समाजाचा अतीप्राचीन मूळ भारतीय समाज आहे. एकेकाळी भारतीय वनसंपत्तीचा मालक असणारा समाज इंग्रजांच्या आर्थिक शोषणामुळे आर्थिक दृष्ट्या दुर्बल बनत गेला. आदिवासी म्हणजे अधिक काळापासून वास्तव्य असणाऱ्या समूह हे आदिवासी समाजाला निसर्ग पूजक आहे. त्यांच्या दैनंदिन जीवनाचे इतर समाजाशी काही देणे घेणे नसते त्यांचे देव भाषा आणि चालीरीती अन्य ग्रामीण शहरी लोकांपेक्षा भिन्न असतात. जंगलात राहणारे काही आदिवासी तेथील उत्पादन या शहरात आणून देतात. भारतीय राज्यघटनेत अशा आदिवासींचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये केला आहे. समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाङ्गी त्यांना नोकरी व्यवसाय निवडणुकात उमेदवार म्हणून त्यांच्यासाङ्गी खास जागा ङ्खेवण्यात आलेल्या आहेत. भारतात ९ ऑगस्ट हा दिवस दरवर्षी आदिवासी दिवस म्हणून साजरा केला जातो. जगातील सर्वच देशांमध्ये आदिवासी जमाती आहेत विविध देशांमध्ये त्यांना वेगवेगळ्या नावाने संबोधले जाते. उदा. अमेरिकेत रेड इंडियन्स ऑस्ट्रेलियात इम्बोरेजीस आणि युरोप खंडातील देशांमध्ये जिप्सी या नावाने संबोधले जाते. आफ्रिकेत आदिवासींच्या समूहाला ज्तपइसम असेही म्हणतात. ज्तपइसम म्हणजे 'जमात' संबोधले जाते. आजही आफ्रिका ,आशिया आणि अमेरिका खंडातील देशामध्ये मोङ्म्या प्रमाणात अदिवासी जमाती आहे. संख्यात्मक दृष्ट्या सर्वात जास्त आदिवासी जमाती आफ्रिका खंडानंतर केवळ भारतातच आहेत. भारतीय संघराज्यात २९ घटक राज्य आणि सर्व केंद्रशासित प्रदेशात आदिवासी जमाती आहे. त्यांची नावे, बोलीभाषा, पोशाख पद्धती, नृत्यांचे प्रकार , आर्थिक क्रिया आणि आदी बाबतीत विविधता आहे . भारतात मोङ्म्या व लहान आकाराच्या ५७० पेक्षाही जास्त जमाती आहेत.

आदिवासी मध्ये मूलनिवासी आदिवासी हा शब्द 'आदी' आणि 'वासी' या दोन शब्दापासून बनलेला आहे. याचा अर्थ मूळ निवासी असा होतो. डॉक्टर धुर्वे यांनी आदिवासी मागासलेले हिंदू असे संबोधले आहे. तर महात्मा गांधी यांनी आदिवासींना गिरीजन असे संबोधले आहे.

डॉ. धुर्वे यांनी आदिवासीना मागासलेले हिंदू म्हटले असले तरीही आदिवासी मात्र मागासलेले हिंदू नाहीत त्यांचा स्वातंर्त्य धर्म आहे रितीरिवाज आहेत. त्यांच्या देवता वेगळ्या आहेत त्यांचा समाज पद्धत वेगळी आहे त्यामुळे आदिवासींना मागासलेले हिंदू म्हणणे चुकीचे आहे.आदिवासी हि काही जमात नाही. ते मात्र मुळचे भारताचे रहिवासी आहेत.

**आदिवासी महिला-** भारतीय स्त्रियांच्या प्रश्नांची चर्चा करताना आदिवासी स्त्रियांचे प्रश्न सातत्याने दुर्लक्षित राहिले आहे. आजही आदिम अवस्थेत जगणाऱ्या आदिवासी स्त्रिया मुक्त असतात स्वतंत्रपणे जगतात म्हणून त्यांचे काहीच प्रश्न नाही असे प्रस्थापित समाजाची धारणा असते. मातृसत्ताक व्यवस्थेच्या पाईक असलेल्या आदिवासी स्त्रिया आजमात्र विपन्न अवस्थेत जगताना दिसतात आदिवासी जमाती जगाच्या वेगवेगळ्या कानाकोपऱ्यात विभागले गेले आहेत. त्यामुळे या जमातींमध्ये संघटनात्मक ऐक्य होत नाही फक्त महाराष्ट्रातील आदिवासी जमातींच्या विचार केला तर त्या त्या भागातील भौगोलिक राजकीय आणि सामाजिक परिस्थितीनुसार आदिवासींचे प्रश्न बदलत गेले आहे. सद्यस्थितीत आदिवासी स्त्री जगण्याच्या जीवघेण्या संघर्षात भरडून निघालेल्या आहे. तिचे जगणे असंख्य विरोधाभासाने भरलेले आहे. आजही आदिवासी जमातींमध्ये मातृसत्ताक व्यवस्थेचा प्रभाव जाणवतो. ब्रिटिश काळापासून आदिवासी जमाती प्रस्थापितांच्या संपर्कात येऊ लागल्यामुळे पितृप्रधान तिकडे वळू लागल्या. धर्म, जात व्यवस्थेतून निर्माण झालेल्या प्रश्नांपासून या स्त्रिया काही प्रमाणात दूर असल्या तरी त्यांचा प्रवास कोणत्या दिशेने सुद्ध झाला आहे. वसाहत काळापासूनच आदिवासींचे धर्मांतर करून घेण्याची प्रक्रिया सुद्ध झाली. आज आदिवासीचे हिंदुकरण करण्याची प्रक्रिया गतिशील आहे यात आदिवासी स्त्रियांचे प्रश्न अधिक बिकट बनत चाललेले आहे.

आदिवासी समाजात गोटूल प्रथा अस्तित्वात आहे. या प्रति विषय प्रस्थापित समाजाचे अनेक समज आणि गैरसमज आहेत. गोटुल मध्ये स्त्रियांना साथीदार निवडण्याचे स्वातंर्त्य आहे. खरे म्हणजे लैंगिक स्वातंर्त्यापासून जमिनीवरच्या अधिकाऱ्यापर्यंत कधी कधी आदिवासी स्त्री स्वतंत्र होती पण जल, जमीन आणि जंगल आमच्या प्रस्थापित आक्रमणामुळे ती हतबल झालेली दिसते. आदिवासीच्या संपन्न लोकसंस्कृतीच्या दाखला दिला जातो. वाहरू सोनवणे सारखे आदिवासी कार्यकर्ते हे अभिमानाने सांगतात की, आदिवासी मुलांसाठी स्त्रियांचे बळी घेत नाहीत, पुरुषी अत्याचाराला बळी पडून आमच्याकडे आत्महत्या करीत नाहीत, आदिवासींमध्ये आजही तेच प्रथा अस्तित्वात आहे मुलाच्या कुटुंबाला वधूमूल्य द्यावे लागते लग्न झाल्यानंतर पुरूष स्त्रीयांकडे येऊन राहतात पण या नैसर्गिक जगण्याला आणि आदिवासींच्या आदिम लोकसंस्कृतीला बाहेर संपर्कामुळे आणि अंतर्गत कारणांमुळे धोका निर्माण झाला आहे. या लोकसंस्कृतीच्या अंतर्गत अमानुष रूढी परंपरा श्रद्धा-अंधश्रद्धा जोपासल्या गेल्या आहेत याचा पहिला बळी

आदिवासी स्त्रीचा आहे.आज धर्म आणि जात उतरंडीच्या सगळ्यात खालच्या स्थानावर आदिवासीचा आहे. आदिम संस्कृतीचे गोडवे गाताना या वास्तवाकडे दुर्लक्ष केले तर आदिवासी स्त्री ही आर्ट गॅलरीत भारतीय सौंदर्याचा नमुना म्हणून लटकलेली दिसते पण प्रत्यक्षात मात्र तिच्या मुलाबाळांसह उपोषणाला बळी ठरलेली असते.कधीकाळी लैंगिक दृष्ट्या मुक्त असलेली आदिवासी स्त्री आज लैंगिक अत्याचाराचे बळी ठरत आहे. हा बाईच्या विनाशाचा प्रवास नाही का, आदिम अवस्थेपासून झालेली माणसाची उत्क्रांती धर्म आणि जात वास्तव विभागली गेली तसा बाईचा प्रवास अधिक बिकट झाला. जंगलात राहणारे आणि आदिम मातृसत्ताक संस्कृतीचे प्रतीक समजले जाणारे आदिवासी स्त्री देखील या शोषणापासून दूर होऊ शकली नाही. चंद्रपूर-गडचिरोली भागातील आदिवासी स्त्री नक्षलवाद्यांच्या लैंगिक अत्याचारांना बळी पडताना दिसतात, तर दुसरीकडे पोलिस अधिकारी देखील स्त्रियांची विटंबना करत या सगळ्या विटंबनेच्या इतिहासात आदिवासींना मुख्य धारेत आना? म्हणजे नेमके काय करा? हा प्रश्न सुटत नाही. आदिवासी स्त्री पुरुषांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांची आर्थिक सांस्कृतिक आणि राजकीय लूटमार करून त्यांना देशोधडीला लावण्याचे उद्योग सध्या सुद्ध आहे. आदिवासींनी स्त्रीच्या दर्जाबद्दल परस्पर विरोधी मते मांडली जातात आदिवासी स्त्री ही गुलाम असते. मूल्य देऊन तिला विकत घेण्यात येते व तिच्याशी पाशवी वर्तन करण्यात येते असा एक दृष्टिकोन आहे. मातृसत्ताक आदिवासी जमाती फार कमी आहे ऑस्ट्रेलियातील व आफ्रिकेतील काही जमाती भारतातील खासी जमात उत्तर अमेरिकेतील या जमाती मातृसत्ताक आहे. ब्रिटिश कोलंबिया सत्ता मातृप्रधान दिसत असली तरी प्रत्यक्ष व्यवहारात स्त्रीच्या भावाकडे सत्ता असते व लग्नानंतर पतीकडे जाते. आदिवासी जमातीत मात्र मालमत्ता आईकडून मुलीकडे जाते जोवर विवाहित मुलगी नवीन निवास स्थान निर्माण करीत नाही तोवर तिचा भाऊ तिचा पती मालमत्तेची व्यवस्था पाहतो.

आर्थिक दृष्ट्या पाहता वधूमूल्य देणाऱ्या जमातीत आदिवासी स्त्रीचा दर्जा निश्चित मानला जात नाही, असे गृहीत धरावे लागते. शेतीप्रधान पशुपालक समाजात स्त्रीचा दर्जा खालावलेला असतो, असे राबर्ट लोईने म्हटले आहे. सर्वसाधारणत: आदिवासी स्त्रीस चांगली वागणूक मिळते. स्त्री जरी नेहमी कामात असली, तरी तिच्या जबाबदार्यास पुरुषांच्या मानाने कमी असतात. आदिवासी जमातीत स्त्रीच्या मासिक विटाळाबद्दल घृणा असते. त्यांना त्या काळात वेगळे ठेवण्यात येते व त्यामुळेच त्यांना धार्मिक जीवनात महत्त्वाचे स्थान दिले जात नाही. मात्र आदिवासी स्त्रियांना प्रगत समाजातील स्त्रियांच्या तुलनेत अधिक लैंगिक स्वातंर्त्य असते. एकंदरीत बघितले गेले तर आदिवासी स्त्रियांच्या नेतृत्व हे पुरुषच करत असतात म्हणून आजही पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रीला दुय्यम स्थान मिळालेले आहे आणि आजही आदिवासी स्त्री यांचा हा राजकारणातील दर्जा त्याचप्रमाणे निर्णय स्वरूपाचा आहे आजही आपण पाहतो आहे की, राजकारणामध्ये आदिवासी स्त्रियांचा सहभाग हा फारच कमी प्रमाणात असतो. राज्यघटनेच्या तरतुदीनुसार ३३: जरी महिलांना राजकारणात आरक्षण असेल तरीही पाहिजे त्या प्रमाणात आदिवासी महिला ह्या स्वत:चे निर्णय स्वत: घेत नाहीत तर त्यांचे सगळे निर्णय हे पुरुष घेत असतात. स्थानिक पातळीवरच्या राजकारणामध्ये महिला फक्त नाममात्र पदावर असतात आणि संपूर्ण सत्ताही आदिवासी समाजातील पुरुष सांभाळत असतात आणि अजूनही आदिवासी महिलांना राजकारणामध्ये पाहिजे त्या प्रमाणात सहभाग मिळालेला आपल्याला दिसून येत नाही.

**भारतीय राज्यघटनेतील आदिवासींच्या संविधानातील तरतुदीह्व -** आदिवासी समाजाचा मागासलेपणा लक्षात घेऊन भारतीय राज्यघटनेमध्ये आदिवासींचे हितसंबंध जपण्यासाङ्की त्यांना पुरेसे संरक्षण देण्यासाङ्की आणि त्यांचे भौतिक जीवनमान उंचावण्यासाङ्की भारतीय संविधानात विशिष्ट तरतुदी करण्यात आल्या आहेत. भारतीय राज्यघटनेतील १९(५), ४६, १६४, पाचव्या अनुसूची सह २४४, २७५, ३३०, ३४३, ३३५, ३३९, ३४०, ३३६(२५) या कलमानुसार काही विशेष तरतुदी करण्यात आले आहे.

(१) धर्म वंश जात लिंग भेद जन्म ङ्किकाण यावद्दन त्यांच्याविरुद्ध पक्षपात केला जाऊ नये अथवा त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकला जाऊ नये यासाङ्की प्रतिबंधक अशी कायद्याची तरतूद करण्यात आली आहे पक्षपात अथवा वेदना झाल्या तर असे वर्तन दंडनीय गुन्हा ङ्करवला जातो.

(२) आदिवासींची प्रगती व्हावी या दृष्टीने शासकीय व निमशासकीय उद्योग महामंडळे इत्यादी ङ्किकाणी आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव पद्धतीने भरती करण्याची तरतूद करण्यात आली आहे. केंद्रीय लोकसेवा आयोग, प्रादेशिक लोकसेवा आयोग, निवड मंडळामार्फत भरल्या जाणाऱ्या जागांपैकी अनुसूचित जमाती पैकी ७५ टक्यांलो पर्यंत जागा राखीव ङ्केवण्यात आल्या आहेत. काही ङ्किकाणी लोकसंख्येनुसार जास्त जागा राखीव आहे शैक्षणिक संस्थांमधील विविध अभ्यासक्रमांसाङ्की लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव कोटा पद्धतीने प्रवेश विनाशुल्क व अल्प शुल्क घेऊन वस्तीगृह सुविधा शिष्यवृत्ती अर्थसहाय्य स्वद्धपातील मदतीचा हात दिला जातो.

(३) संसद, विधिमंडळे, महानगरपालिका, नगर परिषदा, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या इत्यादी लोकप्रतिनिधी संस्थांमध्ये त्यांचे प्रतिनिधी लोकसंख्येच्या प्रमाणात असावे याची हमी देण्याच्या दृष्टीने त्यांच्यासाङ्की जागा राखून ठेवले आहे. १९७४ च्या अहवालानुसार भारतीय लोकसभेची जागा आदिवासींसाठी राखून ठेवले आहे. त्याचबरोबर विविध राज्यातील विधानसभेत एकूण ३७७१ जागांपैकी ३२१ जागा आदिवासीं करिता सुरक्षित आहेत. महाराष्ट्र विधानसभेचे आदिवासी प्रतिनिधींच्या संख्या१६ आहे.

(४) जंगल व जमिनी विषयी हक्क सुरक्षित राहावे या दृष्टीने आवश्यक ते कायदे करण्याची जबाबदारी केंद्र व राज्य सरकारवर टाकलेली आहे जमीन हा विषय सरकारच्या अखत्यारीत येत असल्यामुळे आदिवासींच्या जमिनी हस्तांतरित प्रतिबंध करणारे तसेच त्यांच्या हातून गेलेल्या जमिनी

परत मिळाव्यात या दृष्टीने योग्य तरतूद असलेले कायदे व राज्य सरकारांनी करावयाचे होते तसेच आदिवासी लोकसंख्या असलेल्या सर्व राज्यांनी केले आहे.

५) आदिवासींच्या परंपरा त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण संस्था व त्यांची संस्कृती यांच्यावर प्रामाणिक आघात केला जाऊ नये किंबहुना त्यांच्यापैकी मुलभूत मानवी हक्क व स्वातंर्त्य सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था यांच्यात आढळून येणार्या अशा संस्था व सांस्कृतिक वैशिष्ट्ये यांची जपणूक व संवर्धन करण्याची भूमिका अंगीकारणे या दृष्टीने आदिवासी लोकसंख्या असलेल्या राज्यांनी सल्लागार मंडळाची नेमणूक करणे बंधनकारक केले आहे.

६) राज्यघटनेच्या चौथ्या भागातील १६४ या कलमान्वये आदिवासींची अधिक वस्ती असलेल्या भागात आदिवासीच्या कल्याणासाञ्ची व विकासासाञ्ची एक स्वतंत्र आदिवासी मंत्री नियुक्त करण्याची तरतूद आहे.

**राजकारणामध्ये आदिवासी महिलांचा सहभाग -** भारतीय घटना समितीने शिक्षण व नोकरी या क्षेत्रात आदिवासी म्हणजेच अनुसूचित जमाती यांच्यासाठी स्पष्ट स्वरूपाच्या तरतुदी भारतीय संविधानात केले. मंडल आयोगाने भारतीय संविधानाचे अन्य मागासवर्गीयांच्या आरक्षणाला अधिक स्पष्ट स्वरूप प्राप्त करून दिले. अनुसूचित जाती व आदिवासींसाठी राखीव मतदारसंघ निर्माण करण्याची तरतूद करून त्यांना राजकीय क्षेत्रात प्रतिनिधित्व देण्याची तरतूद संविधानात करण्यात आली. भारतीय समाजात अनुसूचित जमाती आदिवासी स्त्रिया देखील दुर्बल घटक आहे परंपरेमुळे पुरुषांच्या वर्चस्व स्त्रिया भरून निघाले आहे. स्वातंर्त्य प्राप्त झाले त्या काळात मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण फारच कमी होते. स्वातंर्त्यपूर्व काळापासून स्त्री शिक्षणाबाबत समाजसुधारकांचे प्रयत्न आणि भारत सरकारचे प्रयत्न व इतर धोरण यामुळे स्त्री शिक्षणाचे प्रमाण बरेच वाढले. शिक्षणाची सर्व क्षेत्रे उदा. मेडिकल, इंजिनियर, लष्कर इत्यादी स्त्रियांसाठी खुली झाली यामुळे सर्व क्षेत्रात पुरुषांप्रमाणे स्त्रियांनीही नोकरी व्यवसाय करू लागले आहेत, परंतु राजकीय क्षेत्रात प्रतिनिधित्व बाबत मात्र स्त्रियांची स्थिती अत्यंत खालावलेली आहे. स्तरावरून निवडून येणाऱ्या स्त्रीयांची संख्या पुरुषांच्या तुलनेत फारच कमी असते.

स्त्रियांचे प्रतिनिधित्व वाढावे यासाठी १९९२ मध्ये ७३ व ७४ वी घटना दुरुस्ती करण्यात आली. ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका, पंचायत समिती व जिल्हा परिषद या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्त्रियांसाठी ३३: जागा आरक्षित करण्यात आले आहे. महाराष्ट्र व अन्य काही राज्य घटक राज्य आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्त्रियांना ५०: आरक्षण मिळावे यासाठी विधी नियम केले आहेत. घटक राज्यांच्या विधानसभा आणि लोकसभेत महिलांसाठी किमान ३३: जागा आरक्षित असाव्यात या आशयाचे महिला आरक्षण विधेयक मंजूर झाले नाही कारण त्याबाबत राजकीय पक्षांची मते परस्परविरोधी आहेत महिला आरक्षणा संबंधित सर्व पक्षांमध्ये एकमत झाल्याशिवाय घटना दुरुस्ती होऊ शकत नाही आणि राजकीय क्षेत्रातील स्त्री प्रतिनिधी त्यांच्या प्रश्न सुटू शकत नाही. शिक्षण नोकरी आणि निवडणुका म्हणजे जनप्रतिनिधी फळांसाठी चे मतदार संघ या तीन क्षेत्रांत जातीच्या आधारावरील आरक्षणाची तरतूद भारतात आहे आर्थिक विकासामुळे एकीकडे रोजगारांच्या संख्येत वाढ होते म्हणजे रोजगार प्राप्त होण्याची संधी तुलनात्मक दृष्ट्या वाढते. दुसरीकडे मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रात स्पर्धा वाढते शिक्षण आणि नोकरी या दोन्ही क्षेत्रात या पूर्वी कधी नव्हती अशा जीवघेण्या स्पर्धेला सामोरे जाण्याची पाळी आलेली आहे. यामुळे आरक्षणाचे समर्थक आणि विरोधक अशा दोघांसाठी अत्यंत भावनात्मक असा नाजूक विषय झाला आहे. भावनात्मक आणि विकासात्मक अशा दोन्ही दृष्टीने आरक्षणाचे प्रश्नांशी निगडीत दोन्ही बाजूंची ओळख करून घेणे आजच्या काळाची एक प्रमुख गरज झाली आहे असे म्हणता येईल. भारतीय संसदेचे सभागृह असणाऱ्या ५४३ सदस्यांच्या लोकसभेत अनुसूचित जमातीचे ४७ (८.४): सदस्य आहे हे सर्व आरक्षित मतदारसंघातून निवडून आलेले आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने घटक राज्याच्या मंत्रिमंडळात अनुसूचित जमाती चे प्रतिनिधी सामील करून घेण्याचा प्रघात नेहरूंच्या काळापासून निर्माण झाला. सत्तारूढ सरकार कोणत्या पक्षाचे असले तरीही राजकीय प्रथेचे पालन केले जाते सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयात न्यायाधीशांची नियुक्ती करताना अनुसूचित जमातींना देण्याचा प्रयत्न केला जातो. स्वतंत्र भारतात कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ या तीनही विभागात अनुसूचित जमातीना प्रतिनिधी देण्यासाठीची घटनात्मक तरतूद आणि राजकीय प्रथा आहे. याशिवाय स्थानिक शासन संस्था मध्ये म्हणजेच ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगर परिषद व महानगरपालिका यांच्यामध्ये अनुसूचित जमाती आणि महिला अशा प्रतिनिधी देण्यासाठी त्यात ७३ आणि ७४ वी घटना दुरुस्ती करण्यात आली. अशाप्रकारे स्थानिक प्रादेशिक आणि राष्ट्रीय स्तरावरच्या शासनाची अनुसूचित जमातींना सुरक्षित मतदारसंघ निर्माण करून प्रतिनिधित्व दिले जाते.

१) अनुसूचित जमाती यांच्यासाठी आरक्षणाची तरतूद ही प्रारंभी दहा वर्षासाठी होती. प्रथम ती पुन्हा दहा वर्षासाठी वाढविण्यात आली हा सिलसिला आजही सुरु आहे. नजीकच्या भविष्यातील मुदत संपली तेव्हा ती पुन्हा पुढील दहा वर्षासाठी वाढवली जाईल हे निश्चित आहे कारण अद्यापही अनुसूचित जमाती यांच्यामध्ये ५० टक्यांल पेक्षा अधिक लोक दारिद्र्यरेषेच्या खाली असणाऱ्या जीवन स्थितीमध्ये जीवन जगत आहेत त्यामुळे जातीय आधारावर असणाऱ्या आरक्षणाच्या तरतुदीची मुदत संपण्याची कोणतीही चिन्हे दिसत नाही.

२) आरक्षणाच्या प्रश्नांचे स्वरूप नजीकच्या भविष्यात अधिक गुंतागुंतीचे होणार हे निश्चित आहे की गुंतागुंत बहुपदरी आणि बहुढंगी स्वरूपाची असणार आहे हे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल उदा.(अ) अनुसूचित जमाती मध्ये इतर जातीचा समावेश करा अशी मागणी आली सूरही मागणी करणार यांचा आवाज बराच आहे, हे मान्य केले तरी दुसरी एक मागणी अधिक वेगाने समोर येऊ लागली आहे ती म्हणजे हिंदू धर्मात

मुस्लीम व ख्रिश्चन धर्मात धर्मांतरित झालेल्या दलित, ख्रिश्चन, मुस्लिम यांना आरक्षणाचे लाभ मिळावेत.

भारत देश स्वतंत होवून इतकी वर्षे लोटली तरीही कुठल्याही जमातीच्या महिलांचा विकास अजूनही झालेला नाही.आपल्या देशातील पुरुषप्रधान संस्कृतीमुळे महिला न धड शाशकीय, निमशाशकीय कार्यालयात काम करू शकत नाही. पूर्वोत्तर काळात जे गणाचे राज्य होते त्या राज्यात गणिका ही राज्यकर्ता असायची, आणि आजच्या आधुनिकीकरणाच्या जगात महिलांचे स्थान हे नेहमीच दुय्यम स्वरूपाचे दिसून येत आहे. त्या आदिवासी समाज हा अधिक मागासलेला ,शिक्षणापासून वंचीत असलेला आणि त्या समाजात महिलांना मिळालेल्या ३३: आरक्षणात सातत्याने पाहिले तर फक्त ग्रामपंचायत,नगरपंचायत, पंच्यात समिती आणि जिल्हा परिषदा यातच त्यांना ७.७: जागेवर निवडून येत येते.त्यातही त्या मात्र नाममात्र असतात. केंद्र आणि राज्यामध्ये तर या बाबतीत दूरदूर पर्यंत महिलांचा सहभाग दिडून येत नाही. विरोधात असणाऱ्या पुरुषांना महिलांपुढे जाने आवडत नाही. जर आदिवासी महिला या विधानसभेत किंवा लोकसभेत गेल्या तर त्या आदिवासी महिलेचे प्रश्न उचलून धरतील. याचा फायदा हा इतर येणाऱ्या मुलींना, महिलांना होईल. ही बाब कुठेतरी विरोधकांना खणत असते आणि म्हणून आजपर्यंत इतिहासात बोटावर मोजण्याइतक्याच महिला आपल्याला आमदार खासदार झालेल्या दिसतात.

फुलन देवी या सन १९९६-१९९८ मिर्झापूर लोकसभा निर्वाचन क्षेत्रातून अकराव्या लोकसभेत निवडून आल्या होत्या.त्या एक निर्मिड आणि खंबीर नेतृत्व म्हणून देशाला परिचित आहेत. मिस चंद्राणी मरुमु या ओडीसा लोकसभा मतदार संघातून निवडून आलेल्या होत्या. त्या उच्च शिक्षित आहे. त्या बिजू जनता दल या पार्टीतर्फे निवडून आलेल्या आहेत. मडावी या २०१९ मध्ये आंध्रप्रदेशातून लोकसभेवर निवडून आलेल्या आहेत. द्रोपदी मुरुमू या झारखंड राज्याच्या पहिल्या महिला राज्यपालपदी आहेत.

वरील परिस्थीचा विचार करता आदिवासी महिलांचा भारतीय राजकारणातील सहभाग तसा कमी आहे . आदिवासी महिलांच्या विकासासाठी आदिवासी महिलांना राजकीय कारभारात सहभागी करून जे आवश्यक त्याचबरोबर राजकीय क्षेत्रातील महिलांसाखी स्वातंर्त्य आरक्षण घोषित केले पाहिजे तेव्हा महिलांचा भारतीय राजकारणात सहभाग वाढेल.

**निष्कर्ष-**

१) आदिवासी महिलांसाठी उच्च शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे.

२) आदिवासी महिलांना राजकारणात मत असतांना त्यांच्यासाठी अधिका अधिक संरक्षणाच्या उपाययोजना वाढविणे आवश्यक आहे.

३) राजकीय सहभागाचे महत्व त्यांना पटवून देणे आवश्यक आहे .

४) आदिवासी महिलांचा उच्च शिक्षणात सहभाग वाढविणे आवश्यक आहे.

५) आदिवासी महिलांसाठी राजकारणातील आरक्षण वाढविणे आवश्यक आहे.

***संदर्भग्रंथ***

*१) Mr.m.wikipedia.in*

*२) रा.ज.लोटे आदिवासी समाजाचे समाजशास्त्र पिंपळापुरे अंड कं.पब्लिशर्स २०१०*

*३) डॉ.शौनक कुलकर्णी, महाराष्ट्रातील आदिवासी डायमं पब्लिकेशन्स, पुणे २००९*

*४) Aarhant multidisciplinary International Education research journal (AMIJR) 2014*

*५) https://hi.m.wikipedia.org*